## <u>अर्ज नि.क्र.५ वरील आदेश</u>

(पारीत दि.०२.०१.२०२४)

सदर दाव्याचा गुणवत्तेवर निकाला लागे पावेतो प्रतिवादींनी वादमिळकतीवरील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करुन वादीला वादमिळकतीतुन बेदखल करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिताचे क्रम ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रस्तुत अर्ज.

२. अर्ज नि.क्र.५, त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे नि.क्र.३७, वादी तर्फे दस्तऐवज यादी नि.क्र.३ व ३५ आणि प्रतिवादीं तर्फे दस्तऐवज यादी नि.क्र.२९ व ३३ प्रमाणे अभिलेखावर दाखल दस्तऐवजांचे अवलोकन करण्यात आले. त्यानंतर उभय पक्षातर्फे त्यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३. मौजे कराड, ता.कराड जि.सातारा येथील नगरभुमापन/फायनल प्लॉट क्र.३९७ (जुना सर्वे नं.३५९/२) क्षेत्रफळ १९८४३.४६ चौ.मी. ही मिळकत वादाचा मुख्य विषय असल्याने या पुढे सोयीकरीता **वादमिळकत** असे संबोधण्यात येत आहे.

४. वादीचे म्हणणे थोडक्यात असे आहे की, त्याचे वडिल निळकंठ कल्याणी यांनी श्री नरसिंह देवस्थान, कराड यांचे कडुन दि.०१.०९.१९९३ रोजी वादमिळकत विकत घेतली होती. सदर खरेदीच्या आधारे वादमिळकतीच्या मालकी आणि वहिवाटी बाबतच्या महसुली नोंदी देखील त्यांच्या नावे घेण्यात आल्या होत्या. तेव्हा पासुन वादमिळकत त्याचे वडिल निळकंठ कल्याणी कब्जे वहिवाटीत होती. पुढे त्याने असे कथन केले की, त्याचे वडिल निळकंठ कल्याणी यांनी दि.२४.१०.२००८ रोजीच्या बक्षीसपत्राद्वारे

वादमिळकत त्याला दान दिली आहे. सदर दानपत्राच्या आधारे वादमिळकतीच्या मालकी हक्काबाबत आणि वहिवाटी बाबतच्या महसुली नोंदी देखील घेण्यात आल्या आहेत. तेव्हा पासुन मालकी हक्काने वादमिळकत आज रोजी पावेतो त्याचेच कब्जे वहिवाटीत आहे.

५. वादीने पुढे असे कथन केले की, धर्मादाय आयुक्त, पुणे यांनी दि.१९.०८.१९९३ रोजी वादमिळकत विक्री करीता दिलेली परवानगी आणि सदर परवानगीच्या आधारे श्री नरसिंह देवस्थान, कराड यांनी दि.०१.०९.१९९३ रोजी निळकंठ कल्याणी यांच्या नावे करुन दिलेले खरेदीखत बेकायदेशीर घोषीत करुन मागण्याकरीता प्रतिवादींनी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.६५३९/२०२३ दाखल केले आहे. सदर पिटीशन मध्ये त्याने वादमिळकतीवर गेली अनेक वर्षापासुन वादीचा ताबा असल्याचे मान्य केले. पुढे त्याने असे कथन केले की, वादमिळकती सोबत प्रतिवादींचा काहीही एक हितसंबंध नसताना त्यांनी दि.२०.११.२०२३ आणि दि. २१.११.२०२३ रोजी वादमिळकतीवर येवुन त्याच्या कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करुन त्याला वादमिळकतीतुन बेदखल करण्याचा प्रयत्न केला. सदर घटनेचा त्याने कराड शहर पोलीस ठाणेत रिपोर्ट देखील दिला. परंतु, काहीही उपयोग झाला नाही. पर्यायाने प्रस्तुत दावा दाखल करणे भाग पडले.

६. प्रतिवादींचे म्हणणे थोडक्यात असे आहे की, त्यांच्या पुर्वहक्कदारांची वादमिळकती मध्ये "मिराशे कुळ" हक्काने वहिवाट होती. सदरची कुळ वहिवाट त्यांनी कोणासही तबदील केलेली नव्हती. परंतु, त्यांचे कुटुंब सन १९६५ साली मौजे आकाईचीवाडी, ता.कराड येथे स्थलांतरीत झाले होते. त्यामुळे, वादमिळकत पडुन राहिली होती. सदर मिळकतीवर वादीचे पुर्वहक्कदार किंवा वादीचा प्रत्यक्ष ताबा कधीही नव्हता व

नाही. त्यामुळे, श्री नरसिंह देवस्थान यांनी धर्मादाय आयुक्त यांच्या बेकायदेशीर परवानगीने निळकंठ कल्याणी यांना दि.०१.०९.१९९३ रोजी करुन दिलेले बेकायदेशीर खरेदीखत आणि सदर बेकायदेशीर खरेदीखता वरुन निळकंठ कल्याणी यांनी दि.२४.१०.२००८ रोजी वादीच्या नावे केलेले बक्षीसपत्र हे खोटे व बनावट आहे. सदर बेकायदेशीर दस्तांवरुन वादी व त्याच्या पुर्वहक्कदारांच्या नावे घेण्यात आलेल्या महसुली नोंदी/फेरफार हे पोकळ ठरत असल्याने त्यांच्या मिराशे कुळास कोणताही बाधा येत नाही. पुढे त्यांनी असे कथन केले की, वादमिळकत विक्री करीता दि.१९.०८.१९९३ रोजी धर्मादाय आयुक्त यांनी दिलेली परवानगी आणि सदर परवानगीच्या आधारे देवस्थान तर्फे दि.०१.०९.१९९३ रोजी निळकंठ कल्याणी यांच्या नावे करुन दिलेले खरेदीखत बेकायदेशीर घोषीत करुन मागण्याकरीता त्यांनी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.६५३९/२०२३ दाखल केले आहे.

७. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले की, वादमिळकती वरील त्यांचे मिराशे कुळाच्या वारसा हक्काचा उलघाडा झाल्यानंतर त्यांनी दि.२९.०६.२०२३ रोजी वादमिळकतीस गेटचे बांधकाम करुन मिराशे मालकी हक्काची वहिवाट सुरु केली आहे. पुढे त्यांनी असे कथन केले की, वैकल्पकरित्या वादमिळकती मध्ये राहण्याचा व त्यावर मालकी दाखविण्याचा वादीला कोणताही अधिकार नसल्याने मा. उच्च न्यायालयात याचीका दाखल केल्यानंतर त्यांनी दि.२९.०६.२०२३ रोजी वादीला वादमिळकतीतुन बेदखल करुन मिराशे मालकी हक्काची वहिवाट सुरु केली आहे. त्यामुळे, प्रस्तुत दावा दाखल करण्यापुर्वीच त्यांनी वादमिळकत कब्जात घेतली आहे. थोडक्यात, प्रस्तुत दावा दाखल तारखेला वादमिळकत वादीच्या ताब्यात नव्हती व आजही नाही या पाश्वभुमीवर प्रस्तुत अर्ज खारीज करण्यात यावा अशी मागणी केली.

८. उभय पक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी असे सिध्द करतो काय की, दाव्याची प्रथमदर्शनी स्थिती त्याच्या बाजुने आहे ? | होकारार्थी |
| २. | वादी पुढे असे सिध्द करतो काय की, सदर दाव्याचा समतोल देखील त्याच्या बाजुने आहे ? | होकारार्थी |
| ३. | वादी पुढे असे सिध्द करतो काय की, तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास त्याचे कधीही भरुन न निघणारे असे अपरीमित नुकसान होईल ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजुर |

## कारणमीमांसा

९. **मान्य बाबी** :- धर्मादाय आयुक्त, पुणे यांनी दि.१९.०८.१९९३ रोजी वादमिळकत विक्री करीता दिलेली परवानगी आणि सदर परवानगीच्या आधारे श्री नरसिंह देवस्थान, कराड यांनी दि.०१.०९.१९९३ रोजी वादीचे पुर्वज निळकंठ कल्याणी यांच्या नावे करुन दिलेले वादमिळकतीचे खरेदीखत बेकायदेशीर घोषीत करुन मागण्याकरीता प्रतिवादींनी दि.१५.०३.२०२३ रोजी श्री नरसिंह देवस्थान आणि वादी व वादीचे पुर्वज यांच्या विरुध्द मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.६५३९/२०२३ दाखल केले ही बाब

वादातीत नाही. दस्तऐवज यादी नि.क्र.३ प्रमाणे अभिलेखावर दाखल रिट पिटीशन क्र.६५३९/२०२३ च्या प्रतीचे अवलोकन केले असता दि.०१.०९.१९९३ रोजीच्या खरेदीवरुन वादमिळकत वादीचे पुर्वज निळकंठ कल्याणी यांच्या ताब्यात होती आणि त्यानंतर दि.२४.१०.२००८ च्या बक्षीसपत्रावरुन वादीच्या ताब्यात आहे ही बाब देखील वादातीत नसल्याचे दिसुन येते.

१०. **<u>युक्तीवाद</u> :–** वादी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री.आर.ए.पाटील यांनी असा युक्तीवाद केला की, दि.०१.०९.१९९३ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताने वादमिळकत वादीच्या पुर्वजांच्या वहिवाटीत होती आणि त्यानंतर दि.२४.१०.२००८ रोजीच्या नोंदणीकृत बक्षीसपत्रावरुन आजपावेतो वादीच्या कब्जे वहिवाटीत आहे. तसेच, सदर दस्तांवरुन वादीच्या नावे महसुली नोंदी देखील घेण्यात आल्या आहेत. शिवाय त्यापैकी कुठलाही दस्त आजपावेतो कोणत्याही न्यायालयाने रद्दबातल ठरविलेला नाही. त्यामुळे, कुठल्याही साक्षी–पुराव्या शिवाय सदरचे दस्त हे खोटे, बनावट किंवा बेकायदेशीर असल्याचे या घडीला ठरविता येणार नाही. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, अभिलेखावर दाखल दस्तांवरुन मागील ३०–४० वर्षापासुन वादमिळकत मालकी हक्काने वादीच्याच कब्जे वहिवाटीत असल्याचे निर्वीवाद सिध्द होते. शेवटी, त्यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादींनी कथन केल्या प्रमाणे त्यांनी दि.२९.०६.२०२३ रोजी वादमिळकतीवर ताबा मिळविलेला नाही परंतु, प्रतिवादी गैरकायदेशीररित्या वादमिळकतीचा ताबा घेवुन वादीला बेदखल करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे, प्रतिवादीं विरुध्द मनाई हुकूम देण्यात यावा.

११. प्रतिवादी तर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एस.व्ही.चव्हाण यांनी असा युक्तीवाद केला

की, प्रतिवादींना दावामिळकतीतील त्यांचे मिराशे कुळाचे वारस हक्काचा उलगडा झाल्यानंतर त्यांनी दि.२९.०६.२०२३ रोजी दावामिळकतीस गेटचे बांधकाम करुन त्यांची मिराशे मालकी हक्काची वहिवाट सुरु केली आहे. त्यामुळे, आज रोजी वादमिळकत प्रतिवादींच्याच कब्जे वहिवाटीत आहे.

१२. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, वादमिळकतीच्या मालकी बाबत वाद असुन देखील वादीने कुठलिही मालकी बाबतची घोषणा न मागता केवळ मनाई हुकमासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. त्यामुळे, **अंथुला सुधाकर वि. पी.बुची रेड्डी, २००८ एआयआर (एससी)२०३३** या खटल्यात मा. सर्वोच्च न्यायालयाने ठरवुन दिलेल्या प्रमाणानुसार केवळ मनाई हुकमाकरीता केलेला दावा विधीमान्य नसल्याने खारीज करण्यात यावा. तसेच, प्रस्तुत दावा दि.२८.११.२०२३ रोजी दाखल करण्यात आला. परंतु, तत्पुर्वी दि.२९.०६.२०२३ पासुनच प्रतिवादींनी मिराशे कुळाने वादमिळकतीवर आपली वहिवाट सुरु केली आहे. त्यामुळे, प्रस्तुत दावा दाखल केला त्यादिवशी वादमिळकतीवर प्रत्यक्ष वादीची वहिवाट नसल्याने **बबन अनंतराव नाईक वि. सौ.प्रमीला उत्तमराव येनारे व इतर, २०११ (६) ऑलएमआर, १५** या निवाडयात मा. उच्च न्यायालयाने ठरवुन दिलेल्या प्रमाणानुसार तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यास वादी पात्र ठरत नाही.

१३. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, धर्मादाय आयुक्त यांनी दिलेली विक्रीची परवानगी गैरकायदेशीर असल्याचे तसेच वादमिळकतीच्या मालकी बाबत वाद असल्याचे वादी व वादीच्या पुर्वजांना माहिती असुन देखील त्यांनी वादमिळकती बाबत पुढील व्यवहार केलेत. थोडक्यात, सदर बाबी वादीने जाणुनबुजून लपवुन ठेवल्यात त्यामुळे **अग्रवाल**

**इंडस्ट्रीज लि. वि.गोल्डन ऑईल इंडस्ट्रीज (पी) लि., १९९९ (३) बॉम्बे.सी.आर.३९०** या निवाडयात मा. उच्च न्यायालयाने ठरवुन दिलेल्या प्रमाणानुसार वादी मनाई हुकूम मिळण्यास पात्र ठरत नाही.

१४. पुढे त्यांनी असा देखील युक्तीवाद केला की, वादमिळकत ही मिराशे कुळाची असल्याचे माहित असुन देखील कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न अवलंबीता त्यांच्या पुर्वजांची वादमिळकतीच्या मालकी हक्काच्या वहिवाटी बाबतची नोंद फसवणुकीने काढुन टाकण्यात आली व त्यानंतर संस्थान व त्यानंतर वादीचे पुर्वज व त्यानंतर वादीच्या नावे वादमिळकतीच्या मालकी हक्काच्या आणि वहिवाटीच्या फसवणुकीने खोटया व बनावट नोंदी घेण्यात आल्या. त्यामुळे, **विश्व विजय भारती वि.फक्रुल हसन, एआयआर १९७६ एससी १४८५** आणि **बळेश्वर तिवारी वि. शेव जतन तिवारी, एआयआर १९९७ एससी २०८९** या न्यायनिवाडयात मा. सर्वोच्च न्यायालयाने ठरवुन दिलेल्या प्रमाणा नुसार वादी मनाई हुकूम मिळण्यास पात्र ठरत नाही.

१५. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, वादमिळकत विक्रीची धर्मादाय आयुक्त यांच्याकडुन प्राप्त केलेली परवानगी ही फसवणुकीने व खोटी घेतली आहे त्यामुळे **गौरीशंकर वि. जोशी अंबा शंकर फॅमिली ट्रस्ट्र, एआयआर १९९६ एससी २२०२, एस.पी.चेंगलवराया नायडु वि.जगन्नाथ, एआयआर १९९४ एससी ८५३, सिताराम वि. द स्टेट ऑफ कर्नाटका, रिट अपील क्र.८१८–८४९/२०१४, मेघमाला व इतर वि. जी.नरसिम्हां रेड्डी व इतर, २०१०(८) एससीसी ३८३** आणि **दिल्ली डेव्हलपमेंट अथॉरिटी वि. बॅन्कमेन्स को.ऑ.ग्रुप हौ.सो.लि.व इतर, एआयआर २०१७ एससी**

**२०११** या खटल्यांमध्ये ठरवुन दिलेल्या प्रमाणानुसार देखील वादी मनाई हुकूम मिळण्यास पात्र ठरत नाही.

१६. पुढे त्यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिदाव्यातील त्यांचे कथन वादीने लेखी जबाब दाखल करुन नाकारलेले नाहीत. शिवाय प्रतिवादींनी दाखल केलेल्या प्रतिवादाव्या मध्ये कुळाचा मुद्दा उपस्थित झाला आहे. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरण कुळ कायदा, १९४८ चे कलम ८५ अ प्रमाणे वर्ग करणे गरजेचे ठरत असल्याने **ईश्वरलाल ठकोरीलाल अलमौला वि. मोतीभाई नागजीभाई, एआयआर १९६५ एससी ४५९** या न्यायनिवाडयात ठरवुन दिलेल्या प्रमाणा नुसार मनाई हुकूम मिळण्यास वादी पात्र ठरत नाही.

१७. शेवटी, त्यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणात कुळ आणि वहिवाटी बाबतचा वाद आहे. त्यामुळे, वादमिळकती बाबतचे वादी व त्याच्या पुर्वजांच्या नावे असलेले मालकी व वहिवाटीचे दस्त हे फसवणुकीने केले आहेत आणि त्याकरीता संपरीक्षेची आवश्यकता आहे असे न्यायालयाचे मत झाल्यास पुढील गुंतागुंत टाळण्याकरीता मा. उच्च न्यायालयाने **मुलजी ऊमरेशी शहा व इतर वि. परदेशीया बिल्डर्स प्रा.लि. आणि इतर, एआयआर १९९८ (बॉम्बे) ८७** या न्यायनिवाडयात ठरवुन दिलेल्या प्रमाणानुसार उभय पक्षांनी "जैसे थे" परिस्थीती ठेवावी असा आदेश पारीत करण्याचा आणि वादमिळकतीची जोपासना करण्याकरीता कोर्ट रिसीव्हरची नेमणुक करण्याचा न्यायालयाला विवेकाधिकार आहे. त्यामुळे, सदर विवेकाधिकाराचा वापर करुन उभय पक्षांनी "जैसे थे" परिस्थीती ठेवावी आणि वादमिळकतीची जोपासना करण्याकरीता कोर्ट रिसीव्हरची नेमणुक करण्यात यावी अशा आदेशाची मागणी केली.

१८. याउलट, वादी तर्फे असा उत्तर युक्तीवाद करण्यात आला की, प्रतिवादी तर्फे दाखल करण्यात आलेल्या वरील एकाही न्यायनिवाडयाचे प्रमाण हाती असलेल्या खटल्यातील तथ्य विचारात घेता मुळीच लागु होत नाही. त्यामुळे, प्रतिवादीचा संपुर्ण युक्तीवाद फेटाळण्यात यावा.

१९. **मुद्दा क्र. १ ते ३ करीता** :- सदर तिनही मुद्दयांचे निष्कर्ष थेट एकमेकांवर परिणामकारक असल्याने वारंवारीता टाळण्याकरीता ते या ठिकाणी एकत्रीत घेण्यात येत आहेत. वर पुर्वीच उल्लेखीत करण्यात आले की, धर्मादाय आयुक्त, पुणे यांनी दि.१९.०८.१९९३ रोजी वादमिळकत विक्री करीता दिलेल्या परवानगीच्या आधारे श्री नरसिंह देवस्थान, कराड यांनी दि.०१.०९.१९९३ रोजी वादीचे पुर्वज निळकंठ कल्याणी यांच्या नावे करुन दिले व त्यानंतर वादीच्या पुर्वजांनी दि.२४.१०.२००८ रोजी वादीच्या नावे वादमिळकतीचे बक्षीसपत्र करुन दिले या बाबी वादातीत नाहीत. शिवाय त्यावरुन वादीच्या नावे सन २००८ पासुन महसुली नोंदी देखील घेण्यात आल्या ही बाब देखील वादातीत नाही.

२०. दस्तऐवज यादी नि.क्र.३ आणि नि.क्र.२९ प्रमाणे अभिलेखावर दाखल दि.०१.०९.१९९३ रोजीच्या खरेदीखताचे आणि दि.२४.१०.२००८ रोजीच्या बक्षीसपत्राचे अवलोकन केले असता सदरचे दोन्ही दस्त हे नोंदणीकृत आहेत. तसेच अभिलेखावर दाखल गाव नमुना ७ अधिकार अभिलेख पत्रावरुन वादमिळकत ही सन १९९२ पासुन त्याचे पुर्वज निळकंठ आण्णाप्पा कल्याणी यांच्या कब्जे वहिवाटीत खरेदीवरुन मालकी हक्काने होती असे दिसुन येते. तसेच, अभिलेखावर दाखल मालमत्ता पत्रकारुन दि.२४.१०.२००८ रोजीच्या

बक्षीसपत्रावरुन सदर वादमिळकतीची नोंद दि.१३.०४.२००९ पासुन फेरफार क्र.४५१० प्रमाणे वादीच्या नावे मालकी हक्काने कायम असल्याचे दिसुन येते. थोडक्यात, सन १९९३ पासुन वादमिळकत वादीच्या पुर्वजांच्या व त्यानंतर सन २००८ पासुन वादीच्या ताब्यात दर्शविणा–या महसुली नोंदीला दि.०१.०९.१९९३ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताचा आणि दि.२४.१०.२००८ रोजीच्या नोंदणीकृत बक्षीसपत्राचा आधार आहे.

२१. या ठिकाणी प्रामुख्याने नमुद करावेसे वाटते की, नोंदणीकृत दस्त आणि त्यावरुन घेण्यात आलेल्या महसुली नोंदी हया प्रामाणीक/वैध आहेत असे कायदेशीर गृहीतक आहे आणि जोपर्यंत प्रथमदर्शनी पुरावा सादर करुन सदर गृहीतकांचे खंडन होत नाही तो पर्यंत सदरचे दस्त व त्यावरुन घेण्यात आलेल्या नोंदी अवैध ठरत नाहीत. प्रतिवादींच्या कथना प्रमाणे सदरचे दस्त व त्यावरुन घेण्यात आलेल्या वादीच्या नावाच्या महसुली नोंदी हया खोटया, बनावट व फसवणुकीने करुन घेण्यात आलेल्या आहेत. अशा परिस्थीतीत सदर दस्तांबाबत असलेल्या गृहीतकाचे खंडन करण्याची जबाबदारी प्रतिवादींवर आहे. त्याकरीता प्रतिवादींनी दस्तऐवज यादी नि.क्र.३३ प्रमाणे वादमिळकतीचे सन १९२४ सालचे खरेदीखत आणि सन १९३३ पासुनचे गाव नमुना ७ व इतर दस्त दाखल करुन वादमिळकत त्यांच्या पुर्वजांच्या मालकी हक्काची व वहिवाटीत होती हे दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, केवळ त्यावरुन वादीच्या व त्याच्या पुर्वजांच्या नावे असलेल्या नोंदणीकृत खरेदीखताचे/बक्षीसपत्राचे किंवा सदर दस्तांवरुन वादीच्या नावे आज रोजी असलेल्या आलेल्या महसुली नोंदीच्या गृहीतकाचे खंडन होत नाही.

२२. उपरोक्त चर्चेवरुन वादीच्या नावे असलेल्या वादमिळकतीच्या नोंदणीकृत

दस्ताचे किंवा त्यावरुन घेण्यात आलेल्या महसुली नोंदी बाबत असलेल्या गृहीतकाचे खंडन होईल असा कुठलाही प्रथमदर्शनी पुरावा प्रतिवादीं तर्फे अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे, सदर नोंदणीकृत दस्त आणि त्यावरुन घेण्यात आलेल्या महसुली नोंदीबाबत असलेल्या गृहीतकाचे प्रतिवादींनी कुठल्याही प्रकारे खंडन केलेले नाही. अशा परिस्थीतीत वादीच्या पुर्वजांच्या नावे असलेले दि.०१.०९.१९९३ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखत आणि दि.२४.१०.२००८ रोजीचे नोंदणीकृत बक्षीसपत्र हे खोटे, बनावट किंवा फसवणुकीने करुन घेण्यात आले किंवा काय या प्रतिवादीच्या कथनांना साक्षीपुराव्यांची आवश्यकता आहे. त्याशिवाय सदरचे दस्त हे खोटे, बनावट किंवा फसवणुकीने करुन घेण्यात आले असे अनुमान या घडीला नोंदविता येणार नाही. शिवाय या घडीलाच तसे अनुमान नोंदविल्यास ते मुदतपुर्व व अकाली ठरेल. त्यामुळे, सदरचे दस्त हे खोटे, बनावट किंवा फसवणुकीने करुन घेण्यात आले असा कुठलाही निष्कर्ष या घडीला नोंदविता येत नाही. थोडक्यात, वादीच्या वादमिळकतीवर असलेल्या मालकी व वहिवाटी बाबत असलेल्या दस्तांविषयी संशय निर्माण व्हावा अशी कुठलिही परिस्थीती अभिलेखावर नाही.

२३. अभिलेखावर दाखल रिट पिटीशन क्र.६५२९/२०२३ च्या प्रतीचे अवलोकन केले असता दि.१५.०३.२०२३ पावेतो वादमिळकत ही अविरतपणे वादी व त्यापुर्वी त्याच्या पुर्वजाच्याच ताब्यात होती ही बाब प्रतिवादींनी स्वतःच मान्य केली आहे. त्यामुळे, या ठिकाणी प्रामुख्याने नमुद करावेसे वाटते की, वादमिळकती वरील गेल्या ४० वर्षापासुन असलेला अविरत ताबा टिकवुन ठेवण्याकरीता प्रतिवादींकडुन होत असलेल्या हरकत अडथळयांबाबत जर वादी प्रस्तुत दावा दाखल करु शकतो तर अशा परिस्थीतीत वादीच्या कुठल्याही विरोधा शिवाय प्रतिवादींनी दि.२९.०६.२०२३ रोजी वादमिळकतीचा

ताबा वादीकडुन सहजपणे प्राप्त केला ही बाब कुठल्याही परिस्थीतीत मुळीच पटण्याजोगी वाटत नाही.

२४. आज रोजी वादमिळकतीवर प्रतिवादींचा ताबा आहे हे दर्शविण्याकरीता प्रतिवादींनी दस्तऐवज यादी नि.क्र.२९ प्रमाणे वादमिळकती वरील तथाकथीत त्याच्या बांधकामाचे फोटो आणि वादमिळकत त्याने स्वतः पार्कींगकरीता दिल्याबाबतचे दस्त दाखल केले आहेत. परंतु, वर पुर्वीच उल्लेखीत करण्यात आले की, वादमिळकतीचा प्रतिवादींनी दि.२९.०६.२०२३ रोजी वादींकडुन ताबा मिळविला या बाबतचा कुठलाही प्रथमदर्शनी वैधीक दस्त अभिलेखावर उपलब्ध नाही. थोडक्यात, प्रतिवादीने वादमिळकतीवर त्याचा ताबा असल्याचे दर्शविण्याकरीता दाखल केलेल्या दस्तांना कुठल्याही पुराव्यांचा आधार नाही. याउलट, वादीने वादमिळकतीवर त्याचाच ताबा आहे व त्याने स्वतः गेल्या अनेक वर्षापासुन वादमिळकत इतरांना भाडयाने दिली होती हे दर्शविण्याकरीता वादीने दस्तऐवज यादी नि.क्र.३५ प्रमाणे अभिलेखावर दाखल केलेल्या दस्तांना वादमिळकतीच्या दि.०१.०९.१९९३ रोजीच्या खरेदीखताचे, दि.२४.१०.२००८ रोजीच्या बक्षीसपत्राचे आणि त्यावरुन अविरतपणे ताबा दर्शविणा–या अभिलेख महसुलीच्या नोंदीचा आधार आहे. त्यामुळे, प्रतिवादींनी वादमिळकतीवर त्याचा ताबा आहे हे दर्शविण्याकरीता अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन आणि छायाचित्रांवरुन प्रतिवादी हे वादमिळकतीवर त्यांचा ताबा भासवुन वादमिळकती वरील वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करुन बेदखल करण्याच्या प्रयत्नात आहे असा वादी तर्फे करण्यात आलेला युक्तीवाद अगदी संयुक्तीक वाटतो.

२५. या ठिकाणी प्रामुख्याने नमुद करावेसे वाटते की, वादीच्या पुर्वजांच्या नावे असलेले खरेदीखत आणि वादीच्या नावे असलेल्या बक्षीसपत्राला प्रतिवादींनी मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.६५२९/२०२३ दाखल करुन आव्हानीत केले ही बाब वादीने स्वतःच दाव्यात नमुद केलेली आहे. त्यामुळे, वादीने जाणुनबुजुन काही बाबी लपविल्यात असा प्रतिवादी तर्फे करण्यात आलेला युक्तीवाद तथ्यहीन ठरतो. त्यामुळे या ठिकाणी सन्मानपुर्वक नमुद करावेसे वाटते की, प्रतिवादी तर्फे दाखल करण्यात आलेल्या वरील एकाही न्यायनिवाडयाचे प्रमाण हाती असलेल्या खटल्यातील तथ्य विचारात घेता मुळीच लागु होत नाही.

२६. उपरोक्त चर्चेवरुन आज रोजी वादमिळकतीवर मालकी हक्काने आजही वादीचाच अविरत ताबा असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. अशा परिस्थीतीत वादमिळकतीवर प्रतिवादी आपला हक्क व ताबा सांगतो यावरुनच प्रतिवादींचा वादमिळकतीवरील वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करण्याचा मानस प्रकर्षाने दिसुन येतो. त्यामुळे, अशा परिस्थीतीत प्रतिवादीं विरुध्द मनाई हुकूम न दिल्यास वादमिळकतीतुन वादीला बेदखल करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, निश्चीतच विनंती कलमा प्रमाणे प्रतिवादींविरुध्द मनाई हुकूम मिळण्यास वादी पात्र ठरतो.

२७. उपरोक्त चर्चेवरुन दाव्याची प्रथमदर्शनी स्थिती आणि समतोल वादीच्या बाजुने असल्याचे दिसुन येते आणि अशा परिस्थीतीत मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कधीही भरुन न निघणारे अपरिमीत असे नुकसान होईल या तीनही बाबी प्रथमदर्शनी सिध्द होतात. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येत आहेत.

२८. **मुद्दा क्र. ४ करीता** :– मुद्दा क्र. १ ते ३ च्या होकारार्थी निष्कर्षा वरुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. असे निर्देशीत करण्यात येते की, प्रतिवादींनी किंवा त्यांच्या वतीने इतर कोणीही वादमिळकतीवरील वादीच्या शांततामय कब्जे वहिवाटीस प्रस्तुत दाव्याचा गुणवत्तेवर निकाल लागेपर्यंत कुठल्याही प्रकारे हरकत व अडथळा निर्माण करु नये.

दि.०२.०१.२०२४ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,<br>
ठिकाण– कराड कराड